रेमुनं. १२७/२०१४
पक्षकारांची नांवे — हनुमंत होले विरुध्द भिवा चोरमले व इतर

निशाणी कमांक ५ खालील आदेश
पारीत दिनांक ९/१/२०१५

मौजे सहजपूर ता. दौंड जि. पुणे येथील शेतजमीन गट कमांक ३६४ क्षेत्र ०हे—९२आर यापैकी ०हे—१५आर शेतजमीन, त्यामध्ये असणारी विहीर व त्यातील पाणी घेण्याचा हक्क याबाबत प्रस्तुतचा दावा दाखल करण्यात आलेला आहे. दाव्यामध्ये वादीने अशी विनंती केली आहे की, दावा मिळकतीची प्रतिवादींनी विकी करु नये व कोणत्याही प्रकारे तबदीली करु नये अशी त्यांचेविरुध्द निरंतरची ताकीद देण्यात यावी.

२ वादीचे असे कथन आहे की, दावा मिळकत ही कै. शिवराम, कै. मल्हारी व कै. रामदास भिवा चोरमले यांची एकत्र कुटूंब मालकीची होती. दावा मिळकतीचे त्यांचेमध्ये वाटप झालेनंतर वादीचे वडील श्री भगवान नारायण होले यांनी बापू रामदास चोरमले यांचेकडून दिनांक १६/१०/२००२ रोजी नोंदणीकृत खरेदीपत्राने खरेदी केली.

सन २००८ मध्ये श्री भगवान होले व त्यांची मुले म्हणजे वादी व त्याचा भाउ जनार्दन यांचेमध्ये दावा मिळकतीचे वाटप करण्यात आले व प्रत्येकी ७.५ आर क्षेत्र वादी व त्याचे भावास मिळाले. सन २०११ मध्ये जनार्दन होले यांनी तहसिलदार दौंड यांचेकडे केलेल्या वाटपाचे हुकूमाचे आधारे दावा मिळकतीचे संपुर्ण क्षेत्र ०हे—१५आर वादीचे नांवे केले. तेव्हापासून दावा मिळकत ही वादीचे प्रत्यक्ष कबजे वहीवाटीत आहे.

३ कै. शिवराम भिवा चोरमले यांचे निधन झालेनंतर कै. गिरीजाबाई शिवराम चोरमले यांनी सन २०१० मध्ये बारामती येथे उपविभागीय अधिकारी यांचे न्यायालयात प्रकरण दाखल केले. त्या प्रकरणामध्ये आदेश झालेनंतर नामदार उच्च न्यायालय मुंबई पर्यन्त सदर प्रकरणामध्ये संबंधित आदेश करण्यात आले. प्रतिवादींनी संबंधित फेरफार कमांक २५० हा बेकायदेशीरपणे रद्द करुन घेतलेला आहे. प्रतिवादी हे दावा मिळकतीचे विकी करण्याचे विचारात आहेत. सबब प्रस्तुतचा दावा व निशाणी कमांक ५ अर्ज वादीस दाखल करणे भाग पडले आहे.

४ प्रतिवादींनी निशाणी कमांक १८ लगत अर्जास म्हणणे सादर केले. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास हरकत नोंदवली. प्रतिवादींनी कथन केले की, प्रतिवादींचे वडील शिवराम भिवा चोरमले यांनी दावा मिळकतीचे दिनांक १२/११/१९४६ रोजी कोंडीबा हरी खोडेकर यांचेकडून नोंदणीकृत खरेदीखत करुन घेतलेले आहे. शिवराम चोरमले यांचे निधनानंतर कायदेशीर वारस म्हणून प्रतिवादींची नोंद झाली. दिनांक १६/१०/२००२ रोजीचा खरेदीखताचा दस्त हा मुलत: बेकायदेशीर आहे. दावा मिळकतीमध्ये आजही प्रतिवादींची मालकी हक्काने वहीवाट आहे. दावा मिळकत विकी करणेचे विचारात प्रतिवादी कधीही नव्हते व नाही.

५ वादीतर्फे विधीज्ञ श्री आर. के. आखाडे व प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री ए. एस. दिवेकर यांचा युक्तीवाद मी ऐकला.

६ वादीस प्रथमदर्शनी केस आहे का, न्यायाचा तराजू वादीचे बाजूने झुकलेला आहे का आणि तुर्तातुर्त ताकीद न दिल्यास वादीचे नुकसान होईल काय हया तीन मुख्य मुद्यांची

चर्चा येथे मी करीत आहे.

७ वादी व प्रतिवादींनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे मी अवलोकन केले. थोडक्यात, वादी व प्रतिवादींची केस दावा मिळकतीच्या अभिलेखांबाबत झालेल्या फेरफारांवर आधारीत आहे असे दिसते. वादीने दिनांक ११/१०/२००२ रोजी झालेल्या नोंदणीकृत खरेदीपत्राची प्रत दाखल केली आहे. बापू रामदास चोरमले यांनी वादीचे वडील भगवान नारायण होले यांचे नांवे दावा मिळकतीचे खरेदीपत्र करुन दिलेले आहे असे दिसते. खरेदीपत्रामध्ये दावा मिळकत गट कमांक ३६४ पैकी ०हे—१५आर च्या चतु:सिमा स्पष्टपणे नमूद केलेल्या आहेत. सदर खरेदीपत्रास बापू चोरमले यांची मुले कैलास, सोमनाथ, संपत व सखाराम यांनी मान्यता दिलेली आहे असे दिसते. सदर खरेदीपत्राचे आधारे दावा मिळकतीमध्ये वादीची कबजे वहीवाट आहे असे दिसून येते. प्रतिवादींनी दावा मिळकतीच्या अभिलेखाचे फेरफार कमांक ९५०, २५५५ चे संदर्भात उपविभागीय अधिकारी बारामती, व विभागीय महसूली अधिकारी पुणे हयांचे कार्यालयामध्ये जी प्रकरणे झाली त्यावरुन दावा मिळकत ही प्रतिवादींची आहे

असे त्यांनी शाबीत करावयाचा प्रयत्न केलेला आहे. परंतु, नामदार उच्च न्यायालय येथे वादीने दाखल केलेल्या याचिका क्रमांक १७७५/२०१३ मधील आदेशाची प्रत वादीने दाखल केलेली आहे. त्यामध्ये माननीय उच्च न्यायालयाने उपविभागीय अधिकारी बारामती व विभागीय आयुक्त पुणे यांचे आदेशास दिनांक ५/३/२०१३ रोजी स्थगिती दिलेली आहे असे दिसते. प्रतिवादींची भिस्त सन १९४६ मध्ये झालेल्या खरेदीपत्रावर आहे. परंतु त्या खरेदीपत्राची प्रत प्रतिवादींनी दाखल केलेली नाही.

८ दावा मिळकतीच्या सन २०१२—२०१३ हया वर्षाच्या सात बारा उता—यावरुनही दावा मिळकतीमध्ये वादीचा कबजा आहे असे प्रथमदर्शनी दिसून येते. म्हणजेच दावा दाखल तारखे दिवशी वादीचा ताबा होता. प्रतिवादींनी कैफीयत निशाणी १८ मध्ये सदरची दावा मिळकत प्रतिवादी हे कधीही विक्री करण्याचे विचारात नव्हते व नाहीत असे कथन केलेले आहे. वर नमूद केलेल्या कागदपत्रांच्या आधारे वादीस प्रथमदर्शनी केस आहे असे दिसते. दावा मिळकतीची ते विक्री करणार नाहीत असे प्रतिवादींनी नमूद केलेले असल्यामुळे

वादीचे विनंतीनुसार प्रतिवादींविरुध्द तुर्तातुर्त ताकीद दिलेस त्यांचे काहीही नुकसान होणार नाही असा निष्कर्षाप्रत मी आलेलो आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज मी मंजुर करीत आहे.

<u>आदेश</u>

१ अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२ प्रतिवादींनी दावा मिळकतीची कोणत्याही प्रकारे विक्री करु नये अथवा त्यामध्ये ति—हाईत इसमांचा हक्क प्रस्थापित करु नये अशी दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यन्त त्यांना तुर्तातुर्त ताकीद देण्यात येत आहे.

दिनांक ९/१/२०१५

पी. एस. कुलकर्णी
सह दिवाणी न्यायाधीश क.स्त.,
दौंड